वर्ष : ०४, अंक : २६२
पाने : ०४, किंमत : ०३ रुपये
संपादक : विनोद कैलास गोरे
RNI NO. : MAHMAR/2022/82056
Follow Us On : www.aksharaj.in
Email : newsaksharaj2021@gmail.com

दैनिक
अचूक वेध, अचूक बातमी
# अक्षराज
संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध




बुलडाणा, रविवार, दि.०४ मे २०२५

## थोडक्यात

### 'कॅनाल'मध्ये वाहून गेलेला जितेंद्र पानपट्टे यांचा मृतदेह मृत अवस्थेत आढळला



**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.०३, मुदखेड (नांदेड) :** मुदखेड शहरातील टीव्ही मेकॅनिकल जितेंद्र रामचंद्र पानपट्टे वय ५३ वर्षे हा दि.२ मे रोज शुक्रवारी दुपारी दोन वाजताच्या दरम्यान मेंडका येथील बोगदा कॅनॉल मध्ये वाहून गेला होता. त्याचा शोध घेण्यासाठी पोलिस प्रशासन व युवक मित्र घेत होते शोध काय लागला नाही.

आज दि.३ मे रोज शनिवारी सकाळी ८ च्या सुमारास उमरी तालुक्यातील सिंधी शिवारातील कॅनाल मध्ये एका पाईपला जितेंद्र पानपट्टे मृत अवस्थेत अडकून सापडला असल्याचं समजताच मुदखेड शहरातील मित्र मंडळ घटनास्थळी धाव घेतली जितेंद्र पानपट्टे यांना कॅनाल मधून बाहेर काढण्यात आले. त्यानंतर उमरी ग्रामीण रुग्णालयात शवविच्छेदन करून प्रेत नातेवाईकांच्या स्वाधीन करण्यात आले.

त्यांच्या पार्थिव देहावर आज दि.३ शनिवार रोजी ४ वाजता मुदखेड शहरातील हिंदू स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. त्याच्या पश्चात आई, पत्नी ,एक मुलगा, एक मुलगी, भाऊ बहीण असा मोठा परिवार आहे. शिक्षक संदीप पानपट्टे यांचे ते मोठे भाऊ होते.

### विंग येथे कंपोस्ट खड्डा भरुया अभियानाचा शुभारंभ



**प्रतिनिधी : सुहास महांगरे**

**दि.०२, खंडाळा :** विंग येथे स्वच्छ भारत मिशन अंतर्गत कंपोस्ट खड्डा भरू आपलं गाव स्वच्छ करू, अभियानाचा शुभारंभ पंचायत समिती खंडाळा चे गट विकास अधिकारी अनिल वाघमारे यांच्या हस्ते करण्यात आला. गावातील घनकचरा व सांडपाणी व्यवस्थापन प्रकल्प शाश्वत स्वरूपात सुरु ठेवण्यासाठी उपाययोजना करणे व सर्व कुटूंबाकडे ५ प्रकारचे डस्टबिनअसावेत त्यामध्ये हिरवा डस्टबिन ओला कचरा, निळा डस्टबिन सुका कचरा, पिवळा डस्ट बिन मध्ये श कचरा,लाल डस्टबिन लहान मुलाचे डायपर, सॅनिटरी नपकिन तसेच औषधाची रॅपर,काळा डस्टबिन मध्ये कागद, प्लास्टिक इ सर्व ग्रामस्थांनी अशा प्रकारे वर्गीकरण करावे असे आहावन केले अभियानाबाबत अनिल वाघमारे यांनी तालुक्यातील सर्व ग्रामविकास अधिकाऱ्यांना मार्गदर्शन केले. यावेळी सहाय्यक गट विकास अधिकारी श्री.प्रकाशकुमार बोबले साहेब, मा उपअभियंता ग्रामीण पाणी पुरवठा श्री. लाड साहेब तालुका समन्वयक अतुल गायकवाड, सीमा गायकवाड,पाणी गुणवत्ता सल्लागार सुप्रिया लोखंडे, सरपंच स्वप्निल तळेकर उपसरपंच पूनम तळेकर सर्व ग्रामपंचायत सदस्य ग्राम विकास अधिकारी ग्रामस्थ व ग्रामपंचायत सर्व कर्मचारी एनोरा कंपनीचे प्रताप मुळीक हे उपस्थित होते.

# साईबाबा मंदिर बॉम्बने उडवण्याची धमकी !

**अक्षराज : वृत्तसंकलन**
**दि.०३, शिर्डी :**

शिर्डीतील साईबाबा मंदिर बॉम्बने उडवून देण्याची धमकी साई संस्थानला ईमेलद्वारे देण्यात आली आहे. हा धमकीचा ईमेल आल्यानंतर सुरक्षा व्यवस्था अलर्ट झाली असून भाविकांच्या सुरक्षेची विशेष काळजी घेण्यात येत आहे. साईबाबा संस्थानसह हजारो पोलिसांचा ताफा सज्ज असून साईभक्तांनी कोणतीही भीती न बाळगता दर्शनासाठी यावं, असं आवाहन साईमंदिर प्रशासनाने केलं आहे..

शिर्डीतील साईबाबा हे लाखो भाविक-भक्तांचे श्रद्धास्थान आहे. हजारो भाविक दररोज साईबाबांचे आशीर्वाद घेण्यासाठी या मंदिरात जात असतात. मात्र शुक्रवारी सकाळी साई संस्थानच्या मेल आयडीवर एका




अज्ञात व्यक्तीकडून धमकीचा मेल पाठवण्यात आला. आम्ही साईबाबा मंदिर बॉम्बने उडवू, असा उल्लेख या ईमेलमध्ये करण्यात आला होता. त्यानंतर सुरक्षा व्यवस्था अलर्ट मोडवर असून भाविकांनी घाबरून जाऊ नये, असं आवाहन मंदिर प्रशासनासह पोलिसांकडून करण्यात आलं आहे. साईबाबा संस्थानचे सुरक्षा अधिकारी रोहिदास माळी यांच्या तक्रारीवरून शिर्डी पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल झाली असून धमकीच्या पार्श्वभूमीवर साईमंदिराची बीडीएस आणि डॉग स्कॉडसह पथकाने कसून तपासणी केली आहे. साईमंदिराच्या सर्व प्रवेशद्वारावर भक्तांचीही कसून तपासणी केली जात असून धमकीचा मेल पाठवणाऱ्या अजित जाकोमोला नावाच्या व्यक्तीविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. साईबाबा मंदिराचे हजारो सुरक्षा कर्मचारी आणि पोलीस पथक भक्तांची काळजी घेण्यास सक्षम असून देशभरातील साईभक्तांनी निश्चितपणे साईदर्शनाला यावं, असं आवाहन साईमंदिराचे कार्यकारी अधिकारी गोरक्ष गाडीलकर यांनी केले आहे.

दरम्यान, यापूर्वी देखील शिर्डीच्या साई संस्थानला धमकीचे मेल आल्याच्या घटना घडल्या होत्या. परंतु यापूर्वीचे पत्र आणि मेल फेक असल्याचं स्पष्ट झालं होतं. अशातच साई संस्थानला पुन्हा धमकीचा मेल आल्याने खोडसाळपणातून कोणी हे कृत्य केले आहे का, या अनुषंगानेही पोलिसांकडून तपास केला जात आहे.

# एक महिन्यापूर्वी पडलेला जिवंत बॉम्ब लष्कराकडून निकामी...

## लष्कराकडून खासदार निलेश लंकेंच्या सूचनेची दखल...

**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.०३, अहिल्यानगर :** राहुरी तालुक्यातील वरवंडी येथे २४ मार्च रोजी दुपारच्या सुमारास एका फायटर जेट विमानातून एक जिवंत बॉम्ब पडला होता. यासंदर्भात खासदार निलेश लंके यांनी लष्करी अधिकाऱ्यांच्या बैठकीत हा बॉम निकामी करण्याच्या सूचना व निर्देश देण्यात आले होते या सुचनेची दखल घेत एक महिन्यानंतर ३० एप्रिल रोजी पुणे येथील भारतीय सैन्य दलाच्या बीडीएस (बॉम्ब डिस्पोज स्कॉड) पथकाने घटनास्थळी येऊन त्या बॉम्बचा फ्युज काढून तो निकामी केला. सदर बॉम्ब गुरुवारी घटना स्थळावरून नेण्यात आला. केके रेंज येथे नेऊन बॉम्बचा विस्फोट केला जाणार असल्याची माहिती सैन्य दलातील अधिकाऱ्यांनी दिली.

दि. २४ एप्रिल २०२५ रोजी दुपारच्या





सुमारास राहुरी तालुक्यातील वरवंडी परिसरातील बांबू प्रकल्पात आकाशातून जाणाऱ्या एका जेट विमानातून एक जिवंत बॉम्ब पडला होता. त्यामुळे मोठ्या प्रमाणात हादरा बसला होता. सदर बॉम्ब पडल्यापासुन वरवंडी परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले होते. तब्बल एक महिना होऊन त्या बेवारस बॉम्बची दखल घेतली नाही. परिसरातील नागरीकांनी जिल्हाधिकारी यांची भेट घेऊन वारंवार पाठपुरावा केला. त्यामुळे जिल्हाधिकारी यांनी दिल्ली येथे संरक्षण विभागाला हि माहिती कळविली होती. काल सकाळी पुणे येथील भारतीय थल सेनेचे नायक सुभेदार प्रकाश कोटगी, हवालदार प्रमोद हनमंताचे, हवालदार टी. कन्नन, हवालदार बी. एन. राव हे बॉम्ब निकामी करणारे पथक घटनास्थळी दाखल झाले. पथकाने जेसीबीच्या सहाय्याने सात फूट खड्ड्यातील जिवंत बॉम बाहेर काढला. बॉम निकामी करणाऱ्या पथकाने बॉमचे मोजमाप केले. सदर बॉम साडेचार फूट लांब, चार फूट व्यास ,४५३ किलो वजनाचा आहे. बॉम्बची पिन निघाली नाही,त्यामुळे बॉम फुटला नाही. अन्यथा एक किलोमीटर परिघातील क्षेत्र उध्वस्त

> नागरिकांच्या जीविताला धोका निर्माण होऊ नये, म्हणून आम्ही तातडीने कारवाई करण्याचे निर्देश दिले होते. त्यास लष्करी प्रशासनाकडून सकारात्मक प्रतिसाद मिळाला. सुरक्षिततेच्या दृष्टीने विचार करून लष्कराने जिवंत बॉम निकामी करण्यात आला त्याबद्दल मी त्यांचे आभार मानतो.
>
> **-- निलेश लंके, खासदार**

झाले असते. तीन ते चार किलोमीटर पर्यंत भूकंप सदृश्य हादरे बसले असते. मोठी जीवित व वित्तहानी झाली असती. अशी माहिती सैन्य दलाच्या अधिकाऱ्यांनी दिली. घटनास्थळी बॉम पाहण्यासाठी गर्दी होऊ नये यासाठी पोलीस व कृषी विद्यापीठाचे सुरक्षा कर्मचारी तैनात करण्यात आले आहेत.

# परिवहनमंत्री सरनाईकांचा १ कॉल, वर्षापासूनचा प्रॉब्लेम सॉल

**अक्षराज : अशोक कुलकर्णी**

**दि.०२, कळंब :** १ कॉल प्रॉब्लेम सॉल, हा डायलॉग आपण पिक्चर मध्ये पाहिला आहे. परंतु याचा प्रत्यय दहिफळ ता. कळंब येथील ग्रामस्थांना गुरुवार (दि.१ मे) रोजी आला आहे.

दहिफळ येथील ग्रामस्थ गेल्या २ वर्षापासून कळंब बोरवली या नवीन बस सुरू होण्यासाठी पाठपुरावा करत होते. परंतु यानात्याकारणाने त्यात यश येत नव्हते. त्यामुळे शेवटी ग्रामस्थांनी १ मे रोजी परिवहन मंत्री तथा धाराशिवचे पालकमंत्री प्रताप सरनाईक यांची सकाळी ०९:०० वाजता जिल्हाधिकारी कार्यालयात भेट घेऊन त्यांच्या कानावर ही व्यथा घातली.

पालकमंत्र्यांनी डायरेक्ट विभाग नियंत्रकांना फोन करून आत्ताच्या आत्ता तात्काळ कळंब बोरवली, मोहा , दहिफळ, येरमाळा पुणे मार्गे गाडी सुरू करून आलेल्या ग्रामस्थांच्या हस्ते नारळ फोडून त्याचे व्हिडिओ व फोटो पाठविण्याची आदेश दिला. त्यानंतर यंत्रणा सतर्क झाली धाराशिव वरून ग्रामस्थ गावात पोचेपर्यंत कळंब बोरवली नवी कोरी गाडी गावात दाखल झाली. त्यानंतर सर्व ग्रामस्थांना आश्चर्याचा धक्का बसला कारण गेले २ वर्षापासून पाठपुरावा करत असतानाही यश येत नव्हते परंतु फक्त एका फोनवर गाडी चालू झाली.

त्यानंतर ग्रामस्थांनी गाडीची पूजा करून पाठपुरावा करणाऱ्या दिलीप अंगरखे, सदाशिव वाघमारे, रामेश्वर भातलवंडे, प्रल्हाद मते, सुजित भातलवंडे, यांच्या हस्ते नारळ फोडून ड्रायव्हर, कंडक्टर यांना फेटे, एसटी बसला पुढील बाजूस नारळाचे फाटे बांधून शुभारंभकरण्यात आला. यावेळी सरपंच चरणेश्वर पाटील ग्रामसेवक सुदर्शन मडके, सुरेश मते,




पोपट पाटील, अंगद मते, भाऊ सुतार, तानाजी मते, महादेव अंगरखे, सतीश मते, बालाजी मते, समाधान मते, समाधान भातलवंडे, ज्योतीबा ढवळे, दत्तात्रय चंदनशिवे, बाराते सह ग्रामस्थांची व परिसरातील नागरिकांची यावेळी मोठ्या प्रमाणावर उपस्थिती होती.

त्यामुळे बोले तैसा चाले या उक्तीप्रमाणे मंत्री प्रताप सरनाईक यांनी आपल्या अधिकाराचा वापर करून यंत्रणा सुतासारखी सरळ केल्यामुळे ग्रामस्थांना व परिसरातील २५ ते ३० गावातील प्रवासाचा होणारा त्रास यामुळे कमी होणार आहे. दहिफळ ग्रामदैवत श्री खंडोबा देवस्थान क तीर्थक्षेत्र दर्जा असून त्यामुळे हजारो खंडोबा भाविक दर रविवारी, यात्रेला येथे येत असतात. त्यामुळे गावाकडील व परिसरातील पुणे, मुंबई नोकरी कामानिमित्त स्थायिक झालेल्या नागरिकांसाठी ही मोठी सोय उपलब्ध झालेली आहे. ही बस कळंब खेर्डा, बोर्डा, मोहा, वाघोली गौर, दहिफळ, सापनाई, येरमाळा, बार्शी, पुणे मार्गे बोरिवली जाईल.त्यामुळे ग्रामस्थांनी व परिसरातील नागरिकांनी परिवहन मंत्री तथा पालकमंत्री प्रताप सरनाईक यांचे अभिनंदन करत आभार मानले आहेत.

# हुनगुंदा ते नागणी रोडवर अवैध वाळू वाहतूक करणारा ट्रक पकडला

**अक्षराज : दत्ता हमंद**

**दि.०२, कुंडलवाडी :** शहरापासून जवळच असलेल्या हुनगुंदा ते नागणी रोडवर अवैधरित्या वाळू वाहतूक करणारा ट्रक बिलोली तहसीलच्या महसूल विभागाच्या पथकाने पकडून जप्त केले आहेत.हि कारवाई दि.१ मे रोजी सकाळी ७ वाजता करण्यात आली.या कारवाईने अवैध वाळू वाहतूक करणा-यांत खळबळ उडाली आहे.

बिलोली तालुका मांजरा नदीत असलेल्या लाल वाळूसाठी प्रसिद्ध आहे.अवैध वाळू वाहतूक रोखण्यासाठी




बिलोली तहसीलने उपविभागीय अधिकारी क्रांती डोंबे,तहसीलदार गजानन शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली अवैध वाळू वाहतूक रोखण्यासाठी पथकांची स्थापना केली आहे.

दि.१ मे रोजी सकाळी ७ वाजेच्या सुमारास हुनगुंदा ते नागणी रोडवर अवैधरित्या वाळूचा अवैध उपसा करून वाहतूक करताना एम एच ४० सी एम २१८३ क्रमांकाचा ट्रक बिलोली तहसीलच्या महसूल विभागाचे मंडळाधिकारी लक्ष्मीकांत अंबेराय, तलाठी पवन ठकरोड, तलाठी भगवान कांबळे यांच्या पथकाने पकडले.

पथकाने ट्रक जप्त करून कुंडलवाडी पोलीस ठाण्याच्या प्रांगणात आणुन लावण्यात आले आहेत. सदरील जप्त केलेल्या ट्रक कारवाई करण्याची प्रक्रिया सुरू आहे.अशी माहिती बिलोली तहसील कार्यालयाकडून दिली आहे.

# बदनाम गल्लीची लेडी डॉन फिजा इराणीला अखेर कल्याणमधून अटक

**अक्षराज : संजय पंडित**

**दि.०३, कल्याण (ठाणे) :** कल्याण डीसीपी स्कॉडने आंबिवली येथील इराणी वस्तीमधून इराणी लेडी डॉनला बेड्या ठोकल्या आहेत.फिजा इराणी असं या लेडी डॉनचं नाव असून तिच्या जवळून पोलिसांनी १ लाख १६ हजार रुपये किमतीचे एमडी ड्रग्ज जप्त केले आहेत. फिजा इराणी विरोधात याआधी देखील अमली पदार्थ तस्करीसह गंभीर स्वरूपाचे गुन्हे दाखल आहेत. गेल्या काही दिवसांपासून कल्याण डोंबिवली परिसरात पोलिसांकडून ड्रग्ज तस्कराविरोधात धडक कारवाई सुरू करण्यात आली आहे. तीन-चार महिन्यांपासून तर सातत्याने ही कारवाई सुरूच आहे.

कल्याण डीसीपी स्कॉडला खडकपाडा पोलीस ठाणे अंतर्गत येणाऱ्या आंबिवली परिसरात बेकायदेशीरपणे एम.डी ड्रग्ज विक्री केले जात असल्याची गुप्त माहिती मिळाली होती. या माहितीच्या आधारे डीसीपी स्कॉडच्या पथकाने अटाळी परिसरात सापळा रचला. या ठिकाणी एक महिला स्कूटी घेऊन उभी होती.

तिच्या हालचाली संशयास्पद वाटल्याने पोलिसांनी तत्काळ तिला हटकले. तिची झडती घेतली असता तिच्याजवळ एक लाख १६ हजार रुपये किमतीचे एम. डी. ड्रग्ज आढळून आले. पोलिसांनी तत्काळ या महिलेला ताब्यात घेतलं. फिजा इराणी असं या महिलेचे नाव आहे.




## मंगल देशा, पवित्र देशा...

**मंगल देशा, पवित्र देशा,**
**महाराष्ट्र देशा... राकट देशा,**
**कणखर देशा, दगडांचा देशा....** असे ज्या महाराष्ट्राचे वर्णन केले जाते त्या महाराष्ट्रात माझा जन्म झाला, त्या महाराष्ट्रात मी लहानाचा मोठा झालो, वाढलो याचा मला सार्थ अभिमान आहे. छत्रपती शिवाजी महाराजांच्या कर्तृत्वाने आणि साधू संतांच्या वाणीने पावन झालेली ही पवित्र महाराष्ट्र भूमी. महात्मा ज्योतिबा फुले, सावित्रीबाई फुले, डॉ बाबासाहेब आंबेडकर, लोकमान्य टिळक, स्वातंत्र्यवीर सावरकर, संत गाडगेबाबा यासारखे महापुरुषही मराठी मातीनेच भारताला दिले. सात बेटांचे शहर म्हणून ओळखली जाणारी व देशाची आर्थिक राजधानी असलेली मुंबई ही याच महाराष्ट्राची राजधानी आहे. देशाला सर्वात जास्त महसूल हा मुंबईतूनच मिळतो, पण याच मुंबईला महाराष्ट्रापासून तोडण्याचा डाव दिल्लीश्वरांनी घातला, तेंव्हा मुंबईसह संयुक्त महाराष्ट्राची निर्मिती करण्यासाठी १०६ हुतात्म्यांना बलिदान द्यावे लागले. याच १०६ हुतात्म्यांमुळे संयुक्त महाराष्ट्राची निर्मिती झाली. महाराष्ट्राची निर्मिती होऊन आज ६५ वर्ष पूर्ण झाली आहेत. या ६५ वर्षात महाराष्ट्राने सर्वच क्षेत्रात प्रगती केली आहे. कला, क्रीडा, साहित्य, शिक्षण, आरोग्य, शेती, जलसिंचन, विज्ञान, तंत्रदान, उद्योग, व्यापार अशा सर्वच क्षेत्रात महाराष्ट्राने नेत्रदीपक प्रगती केली आहे. आज महाराष्ट्र देशातील प्रगत राज्य म्हणून ओळखले जाते.

जगाला हेवा वाटावा असा निसर्ग महाराष्ट्राला लाभला आहे. एककिडे उंचच सह्याद्रीच्या रांगा तर दुसरीकडे ७२० किलोमीटरचा निसर्गरम्य समुद्रकिनारा. महाराष्ट्राला निसर्गाने भरभरून दान दिले आहे. असे असले तरी आजही महाराष्ट्रात अनेक समस्या आणि आव्हाने आहेत. महाराष्ट्रातच आज मराठी भाषेची गळचेपी होऊ लागली आहे. परप्रांतीयांच्या लोंढ्यामुळे मुंबई सारख्या शहरातून मराठी माणूस हद्दपार होतो की काय, अशी शंका येऊ लागली आहे. अमृताातही पैज जिंकणारी असे जीचे वर्णन केले जाते, त्या मराठी भाषेची महाराष्ट्रातच उपेक्षा होऊ लागली आहे. मराठी भाषा बोलायला तरुणांना लाज वाटते. आज मराठी तरुण मराठी भाषा बोलण्याऐवजी हिंदी व इंग्रजी बोलण्याला प्राधान्य देत आहे. हिंदी व इंग्रजीच्या आक्रमणामुळे मराठी भाषा महाराष्ट्रातच मागे पडू लागली आहे. पालकही आपल्या पाल्यांना मराठी ऐवजी इंग्रजी माध्यमाच्या शाळेत दाखल करू लागले आहेत. विद्यार्थ्यांअभावी मराठी माध्यमाच्या शाळा बंद पडू लागल्या आहेत. अभिजात भाषेचे सर्व निकष पूर्ण करूनही मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा दिला जात नाही. सर्वसामान्य नागरिकांपासून, साहित्यिक तसेच राज्यातील अनेक नेत्यांनी ही मागणी करूनही शासन दरबारी त्याला वाटण्याच्या अक्षता लावल्या जात आहेत.

आज राज्यातील ४० टक्के जनता ही तरुण आहे. पण, या तरुणांच्या हाती रोजगार नाही. राज्यात बेरोजगारीने कळस गाठला आहे. शिक्षण व गुणवत्ता असूनही हाती काम नसल्याने तरुणांना नैराश्य आले आहे. जर या तरुणांना नैराश्यातून बाहेर काढायचे असेल तर सरकारने रोजगार वाढीसंदर्भात धोरणात्मक निर्णय घ्यायला हवेत. महाराष्ट्रातील तरुणांमध्ये प्रचंड ऊर्जा आहे. मेहनत करण्याची त्यांची तयारी आहे. जर या तरुणांच्या मेहनतीचा आणि ऊर्जेचा सरकारने उपयोग करून घेतला तर महाराष्ट्र देशातील नंबर १ चे राज्य बनेल. माझ्या स्वप्नातील महाराष्ट्रातील तरुण सुशिक्षित असेल पण बेरोजगार नसेल. तरुणांप्रमाणेच शेतकरी, कष्टकरी व वंचित वर्गाचे अनेक प्रश्न आहेत. तरुणांप्रमाणे शेतकरी, कष्टकरी व वंचित वर्गाचे प्रश्न सुटले तर महाराष्ट्रात पुन्हा एकदा शेतकरी, कष्टकरी वर्गाचे राज्य येईल. माझ्या स्वप्नातील महाराष्ट्र उद्योग व्यवसायात अग्रेसर असेल. शेतीसहित अनेक लहान मोठ्या उद्योगांचा विकास झालेला असेल तो ही पर्यावरणाचा ऱ्हास न होता. माझ्या स्वप्नातील महाराष्ट्रात पी जी ते के जी शिक्षण मोफत असेल. माझ्या स्वप्नातील महाराष्ट्रात एकही मूल शिक्षणापासून वंचित राहणार नाही. माझ्या स्वप्नातील महाराष्ट्रात सर्वांना परवडेल अशा दरात आरोग्यसेवा उपलब्ध असेल. पैसे नाहीत म्हणून कुणाचाही जीव जाणार नाही. माझ्या स्वप्नातील महाराष्ट्रात भ्रष्टाचाराला थारा नसेल. शिवशाहित ज्याप्रमाणे माताभगिनी सुरक्षित होत्या, तशाच माझ्या स्वप्नातील महाराष्ट्रातही माताभगिनी सुरक्षित असेल. माझ्या स्वप्नातील महाराष्ट्रात जात-पात, धर्म -वंश याला थारा नसेल. भय, भूक आणि भ्रष्टाचार मुक्त असा माझा स्वप्नातील महाराष्ट्र असेल. माझ्या स्वप्नातील महाराष्ट्राची कीर्ती केवळ भारतातच नाही तर जगात पसरेल. संपूर्ण जगाला हेवा वाटेल असा माझा स्वप्नातील महाराष्ट्र असेल.

# ।। प्रत्येकाला प्रेस स्वातंत्र्याचे महत्त्व कळावे ।।

दरवर्षी ३ मे हा दिवस प्रेस स्वातंत्र्याच्या मूलभूत तत्त्वांचा उत्सव साजरा करण्यासाठी, जगभरातील प्रेस स्वातंत्र्याचे मूल्यांकन करण्यासाठी, त्यांच्या स्वातंत्र्यावरील हल्ल्यांपासून माध्यमांचे रक्षण करण्यासाठी आणि त्यांच्या व्यवसायात प्राण गमावलेल्या पत्रकारांना श्रद्धांजली वाहण्यासाठी साजरा केला जातो. सन १९९१मध्ये युनेस्कोच्या महासभेच्या सव्वीसव्या सत्रात स्वीकारलेल्या शिफारशीनंतर सन १९९३मध्ये संयुक्त राष्ट्रांच्या महासभेने जागतिक प्रेस स्वातंत्र्य दिनाची घोषणा केली. त्यावेळेस ऐतिहासिक विंडहोक घोषणापत्र तयार करणाऱ्या आफ्रिकन पत्रकारांच्या आवाहनाला हा प्रतिसाद होता. पत्रकारितेस प्रेरणादायक असा श्री कृष्णकुमार आनंदी-गोविंदा निकोडे गुरुजींचा सदर महत्त्वपूर्ण संकलित लेख... **- संपादक**



लोकशाहीचा चौथा स्तंभ म्हटल्या जाणार्या प्रसारमाध्यमांचे स्वातंत्र्य अत्यंत महत्त्वाचे आहे. माध्यमे मुक्त असतील तरच ते आपले काम चोख बजावू शकतील. सत्य समोर आणण्यासाठी आणि आपली जबाबदारी पार पाडण्यासाठी मीडियावाले आपला जीवही गमावतात. माध्यमांच्या स्वातंत्र्यावर आणि सुरक्षेवर प्रश्नचिन्ह उभे असताना अशी उदाहरणे रोज आपल्यासमोर येतात. कधी स्पष्टवक्ते म्हणून तर कधी मोठे घोटाळे उघडकीस आणण्यासाठी, अनेकदा माध्यमांना आपले कर्तव्य बजावण्याचा फटका सहन करावा लागतो. प्रसारमाध्यमांतील पत्रकारांना अभिवादन करण्यासाठी दरवर्षी ३ मे रोजी जागतिक पत्रकार स्वातंत्र्य दिन साजरा केला जातो जेणेकरून प्रत्येकाला प्रेस स्वातंत्र्याचे महत्त्व सांगितले जाऊ शकते आणि विचार स्वातंत्र्याचा अधिकार प्रस्थापित करता येईल. यासोबतच आपली जबाबदारी पार पाडताना प्राण गमावलेल्या पत्रकार आणि प्रसारमाध्यमांचे या दिवशी स्मरण केले जाते.

सन १९९३मध्ये ३ मे हा दिवस पत्रकार स्वातंत्र्य दिन म्हणून घोषित करण्यात आला होता. युनेस्कोने २६व्या सर्वसाधारण परिषदेत ३ मे हा प्रेस स्वातंत्र्य दिन म्हणून घोषित केला. दरवर्षी पत्रकार स्वातंत्र्य दिन एका थीमसह साजरा केला जातो या थीमद्वारे डिजिटल मीडियावरील जनतेचा विश्वास आणि या सर्वांच्या परिणामांवरही प्रकाश टाकण्यात येतो. अभिव्यक्ती स्वातंत्र्य हा मूलभूत अधिकार आहे आणि जगभरातील घडामोडींची माहिती जनतेला देण्यात प्रेस महत्त्वाची भूमिका बजावते. ग्लोबल कॉन्फरन्स पत्रकार, नागरी समाजाचे प्रतिनिधी आणि राष्ट्रीय अधिकारी यांना उपाय शोधण्यासाठी एकत्र काम करण्याची संधी देते. सन १९४८मध्ये मानवी हक्कांच्या सार्वत्रिक जाहीरनाम्याच्या कलम १९मध्ये प्रत्येकाला अभिव्यक्ती स्वातंत्र्याचा अधिकार आहे, प्रत्येकाला आपले मत निर्भयपणे व्यक्त करण्याचा अधिकार आहे आणि प्रत्येकाला आपले मत व्यक्त करण्यासाठी प्रेसचा वापर करण्याचा अधिकार आहे, यावर भर देण्यात आला आहे. जागतिक पत्रकार स्वातंत्र्य दिन दरवर्षी ३ मे रोजी साजरा केला जातो. हा दिवस प्रेस स्वातंत्र्याचे महत्त्व आणि लोकशाही, पारदर्शकता, आणि मानवी हक्कांच्या संरक्षणासाठी पत्रकारितेच्या भूमिकेची आठवण करून देतो.

जागतिक पत्रकार स्वातंत्र्य दिनाचे महत्त्व: प्रेस स्वातंत्र्य- प्रेस स्वातंत्र्य म्हणजे लोकांना सत्य माहिती मिळवण्याचा आणि व्यक्त करण्याचा अधिकार आहे. लोकशाही- पत्रकारितेमुळे लोकांना सरकार आणि इतर संस्था यांच्याबद्दल माहिती मिळते, ज्यामुळे लोकशाही मजबूत होते. पारदर्शकता- पत्रकारिता लोकांना सरकार आणि इतर संस्था यांच्या कामाबद्दल माहिती मिळवण्यास मदत करते, ज्यामुळे पारदर्शकता वाढते. मानवाधिकार- पत्रकारिता मानवाधिकार आणि सामाजिक न्याय प्रस्थापित करण्यास मदत करते. जनजागृती- हा दिवस पत्रकारांना आणि सामान्य लोकांना प्रेस स्वातंत्र्याच्या आव्हानांबद्दल जागरूक करतो. सुरक्षितता- हा दिवस पत्रकारांना त्यांच्या कामात येणाऱ्या अडचणी आणि धोक्यांबद्दल जागरूकता वाढवतो.

जागतिक पत्रकार स्वातंत्र्य दिनाची सुरुवात: संयुक्त राष्ट्र महासभेने १९९३मध्ये हा दिवस जागतिक स्तरावर साजरा करण्याचा निर्णय घेतला. ३ मे रोजी हा दिवस साजरा करण्यास सुरुवात झाली.

**जागतिक पत्रकार स्वातंत्र्य दिनाची थीम-**

दरवर्षी, जागतिक पत्रकार स्वातंत्र्य दिनासाठी एक विशिष्ट थीम निवडली जाते, जी प्रेस स्वातंत्र्याच्या वेगवेगळ्या पैलूंवर लक्ष केंद्रित करते. निष्कर्ष: जागतिक पत्रकार स्वातंत्र्य दिन प्रेस स्वातंत्र्याचे महत्त्व अधोरेखित करतो आणि पत्रकारांना त्यांच्या कामात येणाऱ्या अडचणी आणि आव्हानांबद्दल जागरूकता वाढवतो. हा दिवस लोकशाही, पारदर्शकता आणि मानवाधिकार यांसारख्या मूल्यांचा आधार आहे. (विविध प्रसार माध्यमांवरून साभार.)

**!! विश्व पत्रकारिता स्वातंत्र्य दिनाच्या सर्व पत्रकार बांधवांना हार्दिक हार्दिक शुभेच्छा जी !!**

**- संकलन व सुलेखन -**
**कृष्णकुमार निकोडे गुरूजी**
**रामनगर वॉर्ड, गडचिरोली.**
**फक्त व्हॉट्सॲप- ९४२३७१४८८३.**

## बेघर झोपड्यांचे निष्कासन करण्याची धडक मोहिम

**अक्षराज : जे. के. पोळ**

**दि.०३, नवी मुंबई :** महानगरपालिका विभागामार्फत आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांच्या निर्देशानुसार व अतिरिक्त आयुक्त (२) डॉ. राहुल गेठे व उप आयुक्त (अतिक्रमण) भागवत डोईफोडे यांच्या मार्गदर्शनाखाली अतिक्रमण विभागाने बेलापूर विभागात बेघर हटविणेसाठीची कारवाई करण्यात आली. नवी मुंबई महानगरपालिका कार्यक्षेत्रातील नेरुळ सेक्टर- २५ मलनिस्सारण केंद्र (एसटीपी) च्या मागे असलेल्या अनधिकृत झोपडया स्वत:हून हटविणे आवश्यक होते. अे विभाग कार्यालय बेलापूर मार्फत तोडक कारवाईचे आयोजन करुन, नेरुळ सेक्टर- २५ मलनिस्सारण केंद्राच्या मागे असलेल्या २५ अनधिकृत झोपडया निष्कासित करण्यात आलेल्या आहेत. तसेच, एल अँड टी ब्रिज खालील सेक्टर- ४२, सिवूड्स, नवी मुंबई, येथील बेघर हटविण्यात आले.

## तयारी..

अवनी वरती जन्नत
खरी कश्मीर शायरी
निखळ निर्मळ सुख
आनंदोत्सवी पायरी

जन्नतवरती मालकी
इच्छा अंतरी भुयारी
जहन्नुममध्ये जायची
पाकडे करती तयारी

दुर्दैवखरोखर आपले
कुचाळखोरी शेजारी
सतत दुस्वास करती
बुध्दी भ्रष्टले आजारी

आतंक खोरां आसरा
सामान्य जना बेजारी
अ सह्य आता सबुरी
फार सोसली मुजोरी

सर्जिकलस्ट्रॉईक करे
तरीहीकशी शिरजोरी
नकली नबाबीरूबाब
रिकामी जरी तिजोरी

बने कफल्लक दरिद्री
खर्चवाढतोयं लष्करी
युध्दसाहित्य भरमारी
खायलानसूदे भाकरी

**- हेमंत मुसरीफ पुणे**
**९७३०३०६९९६**

# वैभव सूर्यवंशी : भारतीय क्रिकेटचे भविष्य




आयपीएल म्हणजे रत्नांची खाण असे म्हंटले जाते कारण दरवर्षी आयपीएल मध्ये असे काही नवीन रत्न उदयास येते की ज्या रत्नांनी संपूर्ण क्रिकेट विश्वच उजळून निघते. अशाच एका उगवत्या रत्नाने केवळ भारतीय क्रिकेटच नव्हे तर संपूर्ण क्रिकेट विश्वच उजुळून निघाले आहे आणि हे रत्न आहे अवघ्या १४ वर्षाचं आणि त्याचं नाव आहे वैभव सूर्यवंशी. सध्या आयपीएलमध्ये वैभव सूर्यवंशी या १४ वर्षाच्या मुलाने सर्वांचे लक्ष वेधून घेतले आहे अर्थात त्याने तसा कारनामा ही करून दाखवला आहे. मूळचा बिहार राज्यातील असलेला वैभव सूर्यवंशी हा अवघा १४ वर्षाचा युवा खेळाडू आहे. राजस्थान रॉयल्स या संघाने ज्यावेळी त्याच्यावर १ कोटी १० लाखांची बोली लावून त्याला आपल्या संघात घेतले त्याच वेळी त्याची चर्चा सुरू झाली. राजस्थान रॉयल्स संघाने या १४ वर्षाच्या मुलावर इतका मोठा दाव का लावला असा प्रश्न विचारला गेला त्याचे उत्तर शोधण्यासाठी थोडं मागे जावे लागेल. वैभव सुर्यवंशीने १२ व्या वर्षीच बिहार कडून १९ वर्षाखालील संघातून विनू मंकड चषक स्पर्धेत भाग घेतला. तिथे त्याने चांगली कामगिरी केल्याने त्याची निवड बिहारच्या रणजी संघात करण्यात आली. बिहारकडून रणजी स्पर्धेत खेळणारा सर्वात कमी वयाचा तो खेळाडू ठरला. १३ व्या वर्षी वैभवने विजय हजारे चषकात धावांचा रतीब घातला त्यामुळे त्याची भारताच्या १९ वर्षाखालील ब संघात निवड झाली. चार संघात झालेल्या स्पर्धेत त्याने ६ डावात १७७ धावा काढल्या त्यात त्याने दोन अर्धशतके झळकावली त्यामुळे ऑस्ट्रेलिया विरुद्ध भारताच्या १९ वर्षाखालील मुख्य संघात त्याची निवड झाली. १९ वर्षाखालील कसोटीतील पदार्पणाच्या सामन्यात त्याने अवघ्या ५८ चेंडूत शतक झळकावले त्यावेळी त्याचे वय १३ वर्ष होते. त्यानंतर १९ वर्षाखालील आशिया कप स्पर्धेत तर त्याने धुमाकूळ घातला. तिथे युएई विरुद्ध त्याने ४६ चेंडूत ७६ धावा काढल्या तर उपांत्य फेरीत श्रीलंके विरुद्ध ३६ चेंडूत ६७ धावा काढल्या. या स्पर्धेपासून त्याची सर्वत्र चर्चा होऊ लागली. ही चर्चा राजस्थान रॉयल्स संघाच्या पदाधिकाऱ्यांना समजली. त्यांनी त्यांचा बॅटिंग कोच असलेल्या विक्रम राठोडला वैभव सूर्यवंशीची फलंदाजी पाहण्यास सांगितली. विक्रम राठोड यांनी वैभवला खेळताना पाहिले आणि त्याला आपल्या संघात घेण्याचे निश्चित केले. त्यांचा मुख्य प्रशिक्षक राहुल द्रविड हा तर नवोदित खेळाडूंना संधी देण्यास प्रसिद्ध आहे. त्याने देखील वैभवची फलंदाजी पाहिली आणि त्याला संधी देण्याचे ठरवले आणि अशा प्रकारे त्याची राजस्थान संघात एन्ट्री झाली. आयपीएल सुरू झाली पण सुरुवातीच्या काही सामन्यात वैभवला संधी मिळाली नाही. लखनऊ या संघाविरुद्ध राजस्थान रॉयल्सने त्याला संधी दिली. वैभव या संधीची वाटच पाहत होता. त्याने या संधीचे सोने करायचे ठरवले आणि पहिल्याच चेंडूवर त्याने अनुभवी शार्दुल ठाकूरला पुढे सरसावत षटकार खेचला आणि सर्वांना चकित केले. या सामन्यात त्याने २० चेंडूत ३४ धावा काढून आपल्या आयपीएल कारकिर्दीची धडाकेबाज सुरुवात केली. दुसऱ्या सामन्यातही त्याने चांगली खेळी केली मात्र आपल्या तिसऱ्या सामन्यात तर त्याने कमाल केली. गुजरात टायटन्स विरुद्धच्या या सामन्यात त्याने केवळ ३८ चेंडूत १०१ धावांची धमाकेदार खेळी करत शतक झळकावले. या शतकासोबत त्याने अनेक विक्रमांना गवसणी घातली. तो आयपीएल इतिहासातील सर्वात कमी चेंडूत शतक झळकावणारा खेळाडू ठरला. केवळ आयपीएलच नाही तर टी २० क्रिकेट इतिहासात सर्वात कमी वयाचा शतक झळकावणारा तो खेळाडू ठरला. आयपीएलमध्ये सर्वात कमी चेंडूत शतक झळकावणारा तो भारतीय ठरला. त्याने अवघ्या ३६ चेंडूत शतक झळकावत युसुफ पठाणचा विक्रम मोडला. एका सामन्यात त्याने सर्वाधिक षटकार मारणारा भारतीय खेळाडू ठरण्याचा विक्रमही त्याने आपल्या नावावर केला. या सामन्यात त्याने ११ षटकार खेचले ते ही ईशांत शर्मा, मोहम्मद सिराज, वॉशिंग्टन सुंदर आणि राशिद खान या आंतरराष्ट्रीय खेळाडूंविरुद्ध. त्याच्या या धडाकेबाज खेळीने सर्व आजी माजी खेळाडू आणि क्रिकेटप्रेमींनी त्याच्यावर कौतुकाचा वर्षाव केला. क्रिकेटचा देव म्हणून ओळखला जाणारा सचिन तेंडुलकरने वैभवच्या खेळीवर ट्विट केले की वैभवची निडर शैली, उत्कृष्ट बॅट स्पीड, चेंडूची लांबी पटकन ओळखण्याची क्षमता आणि चेंडूच्या मागे ताकद लावण्याची तयारी, या सर्वांचा संगम त्याच्या धमाकेदार खेळीमागे होता. ३८ चेंडूत १०१ धावा जबरदस्त कामगिरी. जबरदस्त खेळ....!

केवळ सचिन तेंडुलकरच नव्हे तर अनेक दिग्गज खेळाडूंनी त्याच्या कौतुकाचे इमले बांधले. केवळ खेळाडूच नव्हे तर क्रिकेट प्रेमींनीही त्याच्यावर कौतुकाचा वर्षाव केला. क्रिकेट प्रेमींनी त्याच्या या खेळीचे व्हिडिओ, फोटो सोशल मीडियावर शेअर करत त्याच्यावर कौतुकाचा वर्षाव केला. मीडिया तर त्याच्यावर फिदाच झाली. त्याच्या या खेळीने त्याने आपण भारताचे भविष्य आहोत हे दाखवून दिले आहे. मुलाचे पाय पाळण्यात दिसतात या म्हणीप्रमाणे त्याने लहान वयातच आपण कोण होणार हे दाखवून दिले आहे. त्याच्या या लाजवाब खेळीने त्याच्यावर अचानक प्रसिद्धीचा झोत आला आहे. वैभवने मात्र या झगमगाटाकडे दुर्लक्ष करून खेळावर लक्ष केंद्रित करायला हवे. त्याला आणखी यशोशिखरे गाठायची असेल तर त्याने झगमगाटापासून दूर राहिलेलेच बरे. प्रसिद्धीच्या झगमगाटात वाहत जाऊन आपल्या करिअरचे मातेरे करणारे अनेक खेळाडू आपण पाहिले आहेत. विनोद कांबळी, पृथ्वी शॉ ही त्याची बोलकी उदाहरणे आहेत. वैभवने आपल्या खेळावर लक्ष केंद्रित करून आणखी मेहनत केल्यास तो भारतीय क्रिकेटचे भविष्य ठरेल यात शंका नाही. वैभवला खूप खूप शुभेच्छा !

**- श्याम ठाणेदार**
**दौंड जिल्हा पुणे**
**९९२२५४६२९५**

This letter was written by owner, publisher, editor - Vinod Kailas Gore by Gayatri Traders at Main Road, At.Po.Chikhli, Tq. Chikhli, Dist. Buldana (MS) Pin No.443201 published from Indira Nagar Ward No.27 Buldana (MAHARASHTRA) Pin No.443001.
Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Buldana Court. Email : newsaksharaj2021@gmail.com **Editor : Vinod Kailas Gore Mob.: 8605313202**
हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक विनोद कैलास गोरे यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड, मु.पो. चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा (म.रा.) पिन क्रमांक ४४३२०१ येथे मुद्रित करून इंदिरा नगर वॉर्ड क्रमांक २७ बुलडाणा पिन क्रमांक ४४३००१ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे.
या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद बुलडाणा न्यायालयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail.com संपादक : विनोद कैलास गोरे मोबा.: ८६०५३१३२०२

